दूरध्वनी क्रमांक :- ०२०-२५५०११२३
अपिल प्राधिकारी तथा उप आयुक्त (सामान्य प्रशासन)
यांचे कार्यालय, पुणे महानगरपालिका, शिवाजीनगर,
पुणे - ४११ ००५
कार्यालयीन वेळ :- सकाळी १०.०० ते ०५.४५
जेवणाची सुट्टी :- दुपारी ०२.०० ते ०२.३०
खात्याचा ई मेल :- dmcgeneral@punecorporation.org
जावक क्रमांक :-अपिल/३६/२०१६/उआ(सा.प्र.)/ ८९३
दिनांक :- ०८/११/२०१६

**अपिल प्राधिकारी तथा उप आयुक्त (सामान्य प्रशासन) यांचे कार्यालय**
**पुणे महानगरपालिका**
**अपिल क्रमांक : पुणे मनपा/अ.प्रा. तथा उप आयुक्त (सा.प्र.)/अपिल/३६/२०१६**

**अपिलकर्त्याचे नांव व पत्ता :-**
श्री. खामकर रमेश विष्णू,
२६४,नारायण पेठ,दै.प्रभात प्रेसजवळ,
पुणे -४११ ०३०.

**जन माहिती अधिकाऱ्याचे नाव व हुद्दा :-**
श्री.शाम तारु, प्रशासन अधिकारी,
आस्थापना विभाग, पुणे महानगरपालिका

श्री. खामकर रमेश विष्णू- अपिलार्थी
विरुध्द
जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, आस्थापना विभागं, पुणे महानगरपालिका

---

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९(१) अन्वये अपिल

अपिलार्थी श्री.रमेश विष्णू खामकर, राहणार- २६४, नारायण पेठ,पुणे - ४११ ०३० यांनी दिनांक ०६/०८/२०१६ रोजी जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, महापालिका आयुक्त कार्यालय यांचेकंडे अर्ज सादर केला आहे. सदरची माहिती ही आस्थापना विभागाशी संबंधित असल्याने जन माहिती अधिकारी तथा अधिक्षक, महापालिका आयुक्त कार्यालय यांनी सदरचा अर्ज पुढील कार्यवाहीसाठी जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, आस्थापना विभाग, पुणे महानगरपालिका यांचेकडे दि.९/८/२०१६ रोजी वर्ग केला आहे.

अपिलार्थी यांनी दिनांक ०६/०८/२०१६ रोजी त्यांचे मूळ अर्जात, '१. पुणे मनपा सेवा सेवाप्रवेश व सेवांचे वर्गीकरण नियम २०१४ अन्वये नगर रचना विभागाची पदनिहाय पदनिर्मितीची माहिती २. त्याप्रमाणे करण्यात आलेल्या नेमणूकांची माहिती (शक्यतो संख्यात्मक ३. नगर रचना विभागासाठी या नियमावलीच्या पूर्वी मान्य पदांची माहिती व त्याप्रमाणे करण्यात आलेल्या नेमणूकांची माहिती ४. इतर अभियांत्रिकी सेवकांच्या करण्यात आलेल्या पदनिर्मिती व त्याप्रमाणे नेमणूकीचा संख्यात्मक तक्ता ५.नगर रचना विभागाकडे शासनाकडून प्रतिनियुक्तीने नेमण्यात आलेल्या सेवकांकडे सेवक निहाय सोपविण्यात आलेली जबाबदारी त्यांनी केलेली कर्तव्य पूर्ती पगारपत्रकरिता कळविण्यात आलेली गृहीत धरण्यात आलेली हजेरी व रजा अर्जाची खात्याकडील माहिती (सहाय्यक संचालक श्रीमती वनमाला कोगजे,उप संचालक श्री.विजयकुमार गोस्वामी,नगर रचनाकार श्री.देव) इ.बाबत ' माहिती मागितली होती.

जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, आस्थापना विभाग यांनी जावक क्र.जमाअ/आस्था/३२७५, दिनांक ०८/०९/२०१६ रोजी चे पत्रान्वये माहितीच्या ३६ प्रतींसाठी रु.७२/- मनपा कोष कार्यालयात भरणा केल्यानंतर माहितीच्या प्रती देण्यात येतील असे अपिलकर्ता यांना लेखी कळविले आहे.

| माहिती अधिकारातील अर्जाचा तपशिल | | | | |
|---|---|---|---|---|
| माहिती अधिकारांतर्गत अर्ज सादर केल्याचा दिनांक | माहिती उपलब्ध करुन द्यावयाचा अंतिम दिनांक | अपिलार्थीस उत्तर पाठविल्याचा दिनांक | अर्जदाराने शुल्क भरल्याचा दिनांक | अर्जदारास माहिती दिल्याचा दिनांक |
| ०६/०८/२०१६ | ०५/०९/२०१६ | ०८/०९/२०१६ | २०/०९/२०१६ | २१/९/२०१६ |

अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांनी अपुरी,विसंगत व खोटी दिशाभूल करणारी माहिती विलंबाने दिल्याचे कारण नमूद करुन दि.०५/१०/२०१६ रोजी प्रथम अपिल अर्ज दाखल केला आहे.

| प्रथम अपिल अर्जाचा तपशिल | | | | |
|---|---|---|---|---|
| प्रथम अपिल अर्ज दाखल करावयाचा अंतिम दिनांक | प्रथम अपिल अर्ज दाखल केल्याचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज मुदतीत दाखल केला आहे का? | प्रथम अपिलाच्या विलंबाबाबत निवेदन दिले आहे का ? | प्रथम अपिल सुनावणी सुचना पाठविल्याचा दिनांक |
| २०/१०/२०१६ | ०५/१०/२०१६ | होय | लागू नाही | २४/१०/२०१६ |

सदर अपिलाची सुनावणी दिनांक ०४/११/२०१६ रोजी सकाळी ११.३० वाजता उप आयुक्त सामान्य प्रशासन कार्यालय,खोली क्र.२३४,दुसरा मजला,पुणे मनपा भवन इमारत येथे आयोजित करण्यात आली होती. सदर सुनावणीस श्री.शाम तारु, जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी हे उपस्थित होते.तसेच अपिलकर्ता श्री.रमेश विष्णू खामकर उपस्थित होते.

जन माहिती अधिकाऱ्याने अपिलार्थीस दिलेल्या उत्तराचा/माहितीचा तपशिल :-

| अ.क्र | अर्जदाराने मागितलेली माहिती | जन माहिती अधिकाऱ्याने दिलेले उत्तर/माहिती |
|---|---|---|
| | १. पुणे मनपा सेवा सेवाप्रवेश व सेवांचे वर्गीकरण नियम २०१४ अन्वये नगर रचना विभागाची पदनिहाय पदनिर्मितीची माहिती<br>२. त्याप्रमाणे करण्यात आलेल्या नेमणूकांची माहिती (शक्यतो संख्यात्मक)<br>३. नगर रचना विभागासाठी या नियमावलीच्या पूर्वी मान्य पदांची माहिती व त्याप्रमाणे करण्यात आलेल्या नेमणूकांची माहिती<br>४. इतर अभियांत्रिकी सेवकांच्या करण्यात आलेल्या पदनिर्मिती व त्याप्रमाणे नेमणूकीचा संख्यात्मक तक्ता | १. सदर माहिती पुणे महानगरपालिकेच्या www.punecorporation.org या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.<br>२. ३<br>३. उपलब्ध माहितीची प्रत सोबत सादर केली आहे.<br>४. सदर माहिती पुणे महानगरपालिकेच्या www.punecorporation.org या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. |